ePaper
आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी अटी शर्तीने सोडले उपोषण !



| वर्ष - 7 | अंक - 176 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 3 नोव्हेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत

- शमी-सिराजचा कहर!
- रिंकू लग्न करणार नाही?
- जनता काँग्रेसला धडा शिकवेल!
- जरांगे पाटील यांचं उपोषण मागे!

# टिकणारे आरक्षण देणार!

## » मुख्यमंत्री एकनाथ शिंदे : कुणाचीही फसवणूक करणार नाही

।मुंबई। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**: मराठा आंदोलनाचे प्रमुख मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घेतल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी ते म्हणाले की, 'आज दोन माजी न्यायाधीश आणि आमचे सहकारी जरांगे पाटलांना भेटायला गेले होते. परवाच माझी त्यांच्याशी फोनवर चर्चा झाली, पाटलांनी काही मुद्दे मांडले. आम्ही त्यांना एवढंच सांगितलं की, सरकार टिकणारे आणि कायद्याच्या चौकटीत बसणारे आरक्षण देण्यासाठी कटीबद्ध आहे.'**



सीएम शिंदे पुढे म्हणाले, 'कुणबी दाखले देण्याबाबत जस्टीस शिंदे समितीला मोठे यश आले आहे. 13 हजार कुणबी दाखले सापडले आहेत, त्यासाठी शिंदे समितीने दिवसरात्र काम केलंय. आम्ही पुढे जो निर्णय घेऊ, तो कायद्याच्या चौकटीत टिकणारा हवा. सरकार म्हणून आमच्याबद्दल लोकांमध्ये कुठलाही संभ्रम निर्माण व्हायला नको.

इतिहासातील पहिली घटना असेल, ज्यात कायदेतज्ञ उपोषणस्थळी बोलण्यासाठी जातात. त्यामुळेच आज जरांगे पाटलांना खात्री पटली की, हे सरकार गांभीर्याने आणि प्रामाणीकपणे काम करत आहे.'

### कुणबी दाखल्यांसाठी जीआर

'जरांगे पाटलांनी काही मुद्दे मांडले आहेत. जस्टिट शिंदे समिती सक्षम करणे, त्यांना प्रत्येक जिल्ह्यात मनुष्य बळ वाढवणे. त्यांचे मुद्दे अतिशय रास्त आहेत. कुणबी नोंदी तपासल्या जातील आणि त्यावर कुणबी दाखले देण्याचा जीआर सरकार काढेल. सरकार म्हणून कुठलाही निर्णय घाईगडबडीत घेणार नाही. आम्ही कुणाचाही फसवणूक करणार नाही, कायदेशीररित्या टिकणारा निर्णय घेऊ,' असंही शिंदे यावेळी म्हणाले.

यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मनोज जरांगे पाटील आणि सकल मराठा समाजाचे आभार मानले. 'मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घेतले, आणि समाजाचे आभार मानतो. शासनाच्या आवाहनाला मान देऊन उपोषण मागे घेतल्याबद्दल सकल मराठा समाजाचे अभिनंदन करतो. आमच्या शासनाच्या शिष्टमंडळासमोर जरांगे यांनी मुद्दे मांडले. न्यायामूर्ती मारोतराव गायकवाड आणि न्यायामूर्ती सुनील शुक्रे यांचेही अभिनंदन करतो', असंही मुख्यमंत्री म्हणाले.

### सर्व त्रुटी दूर केल्या जातील

» शिंदे पुढे म्हणाले, 'जरांगे पाटलांनी जी दोन महिन्यांची मूदत दिली आहे, त्यात जास्तीत जास्त काम करू. इतर समाजावरही अन्याय होऊ देणार नाही. दुसरा टप्पा सुप्रीम कोर्टाची क्युरेटिव्ह पिटीशन, यावरही काम करत आहोत. यापूर्वी कोर्टाने आरक्षण देता येणार नाही, असा निर्णय दिला होता. त्यावेळी कोर्टाने जे मुद्दे मांडले, ज्या त्रुटी मांडल्या, त्यावर शिंदे समिती काम करत आहे. मराठा समाज मागास कसा, ते सिद्ध करण्याचेही काम करणार आहोत. मागच्या निर्णयातील त्रुटी दूर केल्या जातील आणि कायद्याच्या चौकटीत टीकणारे आरक्षण देण्याचे काम सरकार करेल.'

### » जरांगे पाटील यांचं उपोषण मागे! आरक्षणासाठी सरकारला नवी डेडलाइन

वृत्त पान 5 वर

# विनापरवाना फटाके स्टॉलवर कारवाई; महापालिकेचा इशारा

## » आतापर्यंत 60 व्यावसायिकांनी घेतली शुल्क आकारून परवानगी

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेचा ग्निशामक विभाग आणि आठही क्षेत्रिय कार्यालयाकडून फटाका स्टॉलसाठी परवानगी देण्यात येत आहे. आतापर्यंत ६० व्यावसायिकांनी परवानगी घेतली आहे. विनापरवाना फटाके स्टॉलवर कारवाईचा इशारा अग्निशामक विभागाने दिला आहे.**





दिवाळीचा सण काही दिवसांवर आला आहे. फटाके विक्रेत्यांची लगबग सुरू आहे. शहरात दरवर्षी अनेक स्टॉल परवानगी न घेताच उभारले जातात. परंतु, यंदा महापालिकेने कडक धोरण राबविण्याचा निश्चय केला आहे. महापालिकेची परवानगी घेऊनच स्टॉल उभारावेत, असे आवाहन महापालिकेच्या वतीने व्यावसायिकांना करण्यात आले आहे. अग्निशामक विभाग आणि आठही क्षेत्रीय कार्यालयाकडून शुल्क आकारून स्टॉलला परवानगी देण्यात येत आहे.

> अग्निशामक विभागाने एक हजार रुपये परवानगी शुल्क आकारून ६० फटाके स्टॉलधारकांना परवानगी दिली आहे. व्यावसायिकांनी फटाका स्टॉल उभारण्यापूर्वी महापालिकेची रितसर परवानगी घ्यावी. नियमांचे पालन करावे.
>
> – **विजयकुमार थोरात,** सहायक आयुक्त, अग्निशामक विभाग

शहर परिसरातून फटाके स्टॉल उभारण्यासाठी ६० जणांनी अर्ज केले होते. त्यांना अग्निशामक विभागाने परवानगी दिली आहे. बेकायदेशीर फटाका स्टॉल उभारल्यास क्षेत्रीय कार्यालयाच्या अतिक्रमण विभागातर्फे कारवाई करण्यात येणार आहे. आगीच्या घटना टाळण्यासाठी स्टॉलशेजारी वाळू ठेवावी. फटाका स्टॉल परिसरात, बिडी, सिगारेट पेटवू नये, ज्वलनशिल पदार्थ ठेवू नये, स्टॉलपासून लहान मुलांना दूर ठेवावे. पाण्याची व्यवस्था ठेवावी, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

# शहरातील कचरा प्रश्न पेटला!

## स्वच्छ सेवा संस्थेबरोबरचा पालिकेचा करार संपुष्टात

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**घरोघरी जाऊन कचरा संकलन करणाऱ्या स्वच्छ सेवा सहकारी संस्थेबरोबरचा महापालिकेचा करार संपुष्टात आला आहे. स्वच्छ बरोबर करार करण्यासंदर्भातील बैठक लांबणीवर पडल्याने ऐन सणाच्या काळात कचरा संकलन व्यवस्थेवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. स्वच्छ संस्थेबरोबर करार न झाल्याने दिवाळीत शहर स्वच्छ ठेवण्यासाठी महापालिकेला कसरत करावी लागणार आहे.**



करार लांबणीवर पडत असल्याने यंदा दिवाळी साजरी न करण्याचा निर्णय स्वच्छ सेवकांनी घेतला आहे. कचरा संकलनासाठी महापालिकेने स्वच्छ सेवा सहकारी संस्थेबरोबर एक वर्षांचा करार केला होता. ही मुदत २५ ऑक्टोबर रोजी संपुष्टात आली. संस्थेबरोबर दीर्घकालीन करार करावा, अशी स्वच्छ संस्थेची मागणी आहे. त्यासंदर्भात स्वच्छच्या पदाधिकाऱ्यांनी महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांच्याबरोबरच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडेही तशी मागणी केली आहे. गेल्या तीन वर्षापासून स्वच्छ संस्थेला सातत्याने अल्प काळाची मुदत देण्यात येत आहे. यासंदर्भात स्वच्छचे पदाधिकारी गेल्या एक महिन्यापासून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटण्याचा प्रयत्न करत आहेत.

स्वच्छ बरोबर दीर्घकालीन करार केला जाईल, असे आश्वासन शिंदे यांनी दिले आहे. मात्र, यासंदर्भात अद्यापही त्यांनी बैठक घेतलेली नसून, आज (१ नोव्हेंबर) मुंबई येथे होणारी बैठकही शेवटच्या क्षणी रद्द करण्यात आली. त्यामुळे स्वच्छला मुदतवाढ मिळणे लांबणीवर पडले आहे. शहरात प्रतीदिन २ हजार ते २ हजार २०० मेट्रिक टन एवढा कचरा निर्माण होतो. सणाच्या कालावधीत कचरा निर्माण होण्याचे प्रमाणही मोठ्या प्रमाणावर वाढते. स्वच्छ संस्थेबरोबर करार न झाल्यास शहरात कचऱ्याची समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे.

> मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबर येत्या काही दिवसांत बैठक होईल. करार संपला असला तरी स्वच्छकडून कचरा संकलनाचे काम सुरू आहे. नागरिकांना दिवाळीत गैरसोयीला सामोरे जावे लागू नये, याची दक्षता स्वच्छ सेवक निश्चित घेईल. मात्र, अल्पकाळाचे करार होत असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी आहे. त्यामुळे यंदा दिवाळी साजरी न करण्याची भूमिका स्वच्छ सेवकांनी घेतली आहे.
> **-हर्षद बर्डे,** संचालक, स्वच्छ सेवा सहकारी संस्था

> स्वच्छ संस्थेबरोबर करार करण्याची महापालिकेची भूमिका आहे. दीर्घकालीन करार करण्याची त्यांची मागणी आहे. त्यासंदर्भात बुधवारी होणारी मुंबईतील बैठक पुढे ढकलण्यात आली आहे. मात्र महापालिका आयुक्त आणि स्वच्छ पदाधिकारी यांच्यात लवकरच बैठक होईल. चर्चेतून योग्य तो निर्णय घेतला जाईल.
> **-संदीप कदम,** उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग, पुणे महापालिका

करार संपुष्टात आल्यानंतरही सध्या स्वच्छ सेवकांकडून कचरा संकलन केले जात आहे. मात्र, करार लांबणीवर पडल्याने आणि अल्पकाळासाठी सातत्याने मुदतवाढ देण्यात येत असल्याने स्वच्छ कर्मचाऱ्यांमध्येही नाराजीचा सूर आहे. गेल्या सतरा वर्षांपासून स्वच्छ संस्था शहरातील घरोघरी जाऊन कचरा संकलन करत आहे. शहरातील ९ लाख ६५ हजार मिळकतींमधील कचरा स्वच्छ कर्मचाऱ्यांकडून संकलित केला जात आहे.

मात्र, महापालिकेच्या पातळीवर स्वच्छच्या प्रारूपाचे खच्चीकरण गेल्या काही वर्षांपासून सुरू करण्यात आले आहे. स्वच्छ संस्थेचे काम काढून घेत एका खासगी संस्थेला हे काम देण्याचा प्रयत्नही महापालिकेच्या स्तरावर करण्यात आला होता.

# आणखी एका दहशतवाद्याला अटक!

## पुण्यासह काही शहरांमध्ये घातपाताचा कट

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**इस्लामिक स्टेटच्या पुणे मॉड्युलप्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) आणखी एका दहशतवाद्याला अटक केली आहे. महंमद शाहनवाज आलम (वय ३१, मूळ झारखंड), असे अटक करण्यात आलेल्या दहशतवाद्याचे नाव आहे. जुलै महिन्यात कोथरूड येथे दोन दहशतवाद्यांना अटक करण्यात आली तेव्हा आलम पसार झाला होता. आलम याचा दहशतवादी कारवायांमध्ये सक्रिय सहभाग आढळून आला आहे.**




राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) शोध घेत असलेल्या महंमद युनूस महंमद याकू साकी (वय २४) आणि महंमद इम्रान महंमद युसूफ खान (वय २३) यांना कोथरूड पोलिसांनी जुलै महिन्यात अटक केली.

त्यांचा साथीदार आलम पसार झाला होता. तेव्हापासून तपास यंत्रणा त्याचा शोध घेत होत्या. लपण्याचे ठिकाण शोधण्यात, शस्त्र चालवण्याचे आणि स्फोटकांचे सराव वर्ग आयोजित करण्यात आलमचा सहभाग होता. पुणे पोलीस आणि राज्य दहशतवादी विरोधी पथकाने (एटीएस) दहशतवाद्यांना अटक करून 'इस्लामिक स्टेट'चे (आयएस) महाराष्ट्र मॉड्यूल उद्ध्वस्त केले.

साकी आणि खान यांनी पुणे आणि सातारा येथील जंगलात बॉम्बस्फोट केले होते. या दोघांना राहण्यास खोली देणारा अब्दुल कादिर दस्तगीर पठाण आणि आर्थिक मदत करणारा मेकॅनिकल अभियंता सिमाब नसरूद्दीन काझी यांना 'एटीएस'ने अटक केली. या दहशतवाद्यांनी पुण्यासह काही शहरांमध्ये घातपाताचा कट आखला होता.

'एनआयए'ने महाराष्ट्र मॉड्यूलप्रकरणी डॉ. अदनान सरकार याला कोंढव्यातून अटक केली. मुंबई, ठाणे आणि पुण्यातून यापूर्वी ताबिश नासीर सिद्दीकी, जुबेर नूर महंमद शेख अबू नुसैबा, शर्जिल शेख आणि झुल्फिकार अली बडोदावाला यांना अटक करण्यात आली.

तरुणांची माथी भडकवून त्यांना 'आयएस'मध्ये भरती करून घेण्याचे महाराष्ट्र मॉड्यूल दहशतवाद्यांनी आखले होते. या दहशतवाद्यांच्या सूचनेनुसार साकी आणि खान घातपाताचा कट आखत होते.

# मेफेड्रॉनच्या विक्रीसाठी आलेल्या चौघांना अटक!

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।


लष्कराच्या दक्षिण मुख्यालयाचे इंटेलिजन्स युनिट आणि गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने संयुक्तपणे शुक्रवार पेठ परिसरात छापा टाकून २ लाख १४ हजार रुपये किमतीचे मेफेड्रॉन (एमडी) जप्त करून चौघांना अटक केली आहे. त्यांचा एक साथीदार फरार आहे. रोनित बिपिन खाडे चैतन्य शिवाजी सावले, सार्थ वीरेंद्र खरे, विशाल कमलेश मेहता (वय १९, रा. सिंहगड रस्ता) यांना अटक करण्यात आली आहे. तर अनुश जोतिबा माने (रा. घोरपडे पेठ) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलिस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर लक्ष्मण घोरपडे यांनी खडक पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ही घटना बुधवारी (१ नोव्हेंबर) दुपारी चारच्या दरम्यान घडली. पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार, शुक्रवार पेठ परिसरात काहीजण मेफेड्रॉन विक्रीसाठी येणार असल्याची माहिती दक्षिण मुख्यालयाच्या इंटेलिजन्स युनिटला मिळाली. या युनिटने पोलिसांच्या मदतीने रात्री छापा टाकून चारजणांना ताब्यात घेतले. हे मेफेड्रॉन घोरपडे पेठ येथे राहणारा अनुश माने याच्याकडून विक्री करीत आणल्याचे समोर आले आहे. आरोपींकडून २ लाख १४ रुपये किमतीचा १० ग्रॅम ७० मिलिग्रॅम मेफेड्रॉन आणि चार मोबाईल असे ३ लाख २४ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अमली पदार्थ विरोधी पथकाच्या पोलीस निरीक्षक अश्विनी सातपुते, पोलीस अंमलदार प्रवीण उतेकर, पांडुरंग पवार, मारुती पारधी, मनोज साळुंके, विशाल दळवी, विशाल शिंदे, योगेश मोहिते यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# ‘प्रधानमंत्री आवास’च्या लाभार्थींना ‘विंटर गिफ्ट’!

## पिंपरी, आकुर्डी प्रकल्पाच्या सोडतीचा मार्ग मोकळा; भाजपा आमदार महेश लांडगे यांचा यशस्वी पाठपुरावा

।पिंपरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**प्रधानमंत्री आवास योजनेंर्गत पिंपरी आणि आकुर्डी येथे उभारलेल्या प्रकल्पातील एकूण ९३८ घरांसाठी अर्ज केलेल्या लाभार्थींना राज्य सरकारकडून ‘दिवाळी गिफ्ट’ मिळाले आहे. आरक्षण प्रयोजनामध्ये बदल करण्याच्या प्रस्तावाला राज्याच्या नगरविकास विभागाने मान्यता दिली असून, आता सोडतीचा (लकी ड्रॉ) मार्ग मोकळा झाला आहे. भाजपा आमदार महेश लांडगे यांनी यासाठी यशस्वी पाठपुरावा केला आहे.**




पिंपरी आणि आकुर्डी येथे पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत सदनिका बांधून पूर्ण झाल्या आहेत. सुमारे ११ हजार नागरिकांनी अर्ज केले आहेत. त्यांचे लक्ष या सोडतीकडे आहे. पण, संबंधित जागांचे आरक्षण ‘बेघरांसाठी घरे’ असल्यामुळे तांत्रिक अडचण निर्माण झाली होती. त्यामुळे महापालिका प्रशासनाने बेघरांसाठी घरे (HDH) ऐवजी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरे (EWS) अशा प्रमाणे योजना राबवण्यात येत आहे. त्यासाठी महापालिका प्रशासक ठराव क्र. २२१ ला दि. ६ डिसेंबर २०२२ रोजी मंजुरी दिली होती. हा प्रस्ताव राज्याच्या नगरविकास विभागाकडे प्रलंबित होता.

दरम्यान, आमदार महेश लांडगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ‘सर्वांसाठी घर’ या संकल्पनेनुसार पिंपरी आणि आकुर्डी प्रकल्पातील घरांचे वाटप व्हावे. प्रकल्प तयार असून, प्रशासनाने तात्काळ ‘लकी ड्रॉ’ काढावा आणि लाभार्थींना घरे वाटप करावीत, अशी मागणी केली होती. तसेच, राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा केला होता. त्याला यश मिळाले आहे.

### नगर रचना विभागाचा निर्णय...

महापलिकेच्या जुन्या हद्दीच्या सुधारित मंजूर विकास योजनेतून आकुर्डी स. नं. १३६/१, आरक्षण क्रमांक २८३ व मौ. पिंपरी स. नं. /गट नं. १०९ पै व ११० पै आरक्षण क्र. ७७ बेघरांसाठी घरे या प्रयोजनार्थ आरक्षित क्षेत्र आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरे (EWS) या प्रयोजनाचे वापराकरिता एकत्रिकृत नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीला नगर विकास विभागाने मान्यता दिली आहे. त्यामुळे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत या प्रकल्पाची सोडत काढणे सुलभ होणार आहे.

> **पिंपरी आणि आकुर्डी येथील प्रकल्पासाठी पंतप्रधान आवास योजनेंतर्गत अर्ज मागवले आहेत. त्या अर्जांची छाननी आणि लाभार्थी निश्चितीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. राज्याच्या नगर रचना विभागाकडे आरक्षण प्रयोजन बदलाचा प्रस्ताव होता. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात या विषयाकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे प्रकल्प पूर्ण झाले असतानाही सोडत काढून लाभार्थी निश्चित करता आले नाही. आता महायुती सरकारच्या काळात घेतलेल्या या निर्णयामुळे संबंधित लाभार्थींना या योजनेचा लाभ देणे सुलभ होणार आहे. यासाठी महायुती सरकारचे आभार व्यक्त करतो. आता तात्काळ सोडत काढावी आणि डिसेंबरअखेर घरांचे लाभार्थींना वाटप करावे, अशी सूचना प्रशासनाला केली आहे.**
>
> - महेश लांडगे, भोसरी विधानसभा, भाजपा पिंपरी-चिंचवड.

# गायत्री इंग्लिश स्कूलमध्ये ‘दिवाळी मेला’

## विद्यार्थ्यांना स्वयंरोजगाराचे धडे : दिवाळीनिमित्त शाळेत विविध उपक्रम

।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शालेय जीवनातच विद्यार्थ्यांना स्वंयरोजगार आणि व्यवहार ज्ञान प्राप्त व्हावे. या उद्देशाने गायत्री इंग्लिश मीडियम स्कूलने दिवाळीनिमित्त ‘दिवाळी मेला’ उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. याद्वारे विद्यार्थ्यांना पणती बनवण्याचे प्रशिक्षणही देण्यात येत आहे.**





स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे (एसव्हीएसपीएम) संस्थापक व अध्यक्ष विनायक भोंगाळे यांच्या संकल्पनेतून भोसरी येथील गायत्री इंग्लिश मीडियम स्कूलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीन विकास व्हावा. तसेच, त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा. या करिता विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते.

शाळेतील विद्यार्थ्यांनी यावर्षी दिवाळीनिमित्त आकर्षक पणत्या तयार केल्या आहेत. त्या सर्व वस्तुंचे प्रदर्शन भरविण्यात येणार आहे.

त्याद्वारे विद्यार्थ्यांना स्वत: बनवलेल्या वस्तुंची विक्री करण्याची संधी मिळणार आहे. पालकांना निमंत्रित करुन ‘दिवाळी मेला’ मध्ये खरेदीचा आनंद लुटता येणार आहे. स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक कविता कडू- पाटील, सचिव संजय भोंगाळे, विश्वस्त सरिता विखे-पाटील यांनी या उपक्रमांचे कौतूक केले आहे.



> व्यावहारिक जीवनात विद्यार्थ्यांना संतुलित जीवन जगता आले पाहिजे. त्यासाठी शालेय शिक्षणासह व्यवहारिक शिक्षणही महत्त्वाचे आहे. ‘दिवाळी मेला’ या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार आणि आत्मनिर्भर बनण्यासाठी प्रेरणा देईल. शिक्षण आणि व्यवहारिक ज्ञान याचा संगम झाल्यास भविष्यकाळात प्रगल्भ पिढी घडेल, असा विश्वास आहे.
>
> - विनायक भोंगाळे, संस्थापक अध्यक्ष, एसव्हीएसपीएम.




**रामजन्मभूमीच्या मुद्द्याने १९९० च्या दशकात भारतीय राजकारणात उलथापालथ घडवली होती. येत्या २२ जानेवारी २०२४ रोजी या मुद्द्याने एक प्रकारचा कळस गाठलेला दिसेल. अनेक बातम्यांनुसार, त्या दिवशी एका मोठ्या सोहळ्यात अयोध्येतील मंदिरात रामाच्या मूर्तीची स्थापना केली जाणार आहे.**

# राम मंदिराचा भाजपला फायदा



वेगवेगळ्या १३६ सनातन परंपरांमधील हजारो धार्मिक नेते या कार्यक्रमाला उपस्थित असतील. या घटनेचा यापुढच्या काळातील देशातील राजकारण आणि समाजावर दीर्घकालीन परिणाम होणार आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या काही महिने आधी हे उद्घाटन होत आहे. सत्ताधारी पक्ष आणि सरकार समाजमाध्यमे तसेच पारंपरिक माध्यमांचा वापर करून मंदिराचे प्रतीक आणि संदेश देशाच्या कानाकोपऱ्यात नेण्याचा प्रयत्न करतील.

अलीकडेच, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत यांनी देशभरातील लोकांना त्यांनी आपापल्या घराजवळील मंदिरांमध्ये हा उत्सव साजरा करण्याचे आवाहन केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि त्यांच्याशी जोडलेल्या विश्व हिंदू परिषदेसारख्या संघटना या सोहळ्याचे ‘लोकोत्सवा’मध्ये रुपांतर करण्यासाठी किती कठोर मेहनत घेतील, हे यातून लक्षात येते. हा सोहळा लोकांच्या मनावर कायमचा ठसवला जावा, त्यांना त्याचा अभिमान वाटावा यासाठी सगळे प्रयत्न केले जातील. हिंदू मतदार म्हणून उदयास आलेला वर्ग आणि या वर्गाच्या वर्तनावर व मानसिकतेवर रामजन्मभूमी मंदिर उद्घाटनासारख्या घटनांचा सामाजिक आणि राजकीय परिणाम जाणून घेणे महत्त्वाचे ठरते. हे उद्घाटन ही एक स्वतंत्र घटना म्हणून वेगळी काढता येणार नाही. हा गेल्या किमान तीन दशकांतील विविध घटनांच्या मालिकेचा आणि त्यातून निर्माण झालेल्या राजकीय मानसिकतेचा एक भाग आहे. रामाच्या स्मृती या घटकात असलेली जबरदस्त क्षमता आपण गेल्या काही वर्षांत अनुभवली आहे. या घटकात हिंदूंच्या एकत्रिकरणाचा हेतू मोठ्या प्रमाणात साध्य करण्याची, जाती-वर्गांपलीकडे जाऊन हिंदूंना एकत्र आणण्याची आणि त्याद्वारे भाजपला राष्ट्रीय स्तरावर महत्त्वाचे स्थान मिळवून देण्याची क्षमता आहे. याव्यतिरिक्त राममंदिराच्या आवारात रामायणात नमूद असलेले शिव, गणपती, हनुमान इत्यादी देव विविध संत आणि शबरी, जटायू, वाल्मिकी इत्यादी देवतांचीही मंदिरे उभारण्यात येणार आहेत. हे देव, देवता, संत विविध उपेक्षित वर्गांना वंदनीय आहेत. त्यामुळे प्रतिकात्मकतेतून सर्वसमावेशकतेचे एक कथ्य (नॅरेटिव्ह) प्रस्थापित केले जाऊ शकते. त्यामध्ये राजकीय लाभ मिळवून देण्याची प्रचंड क्षमता आहे. मंदिराच्या उद्घाटनाचे भाजपला तीन प्रकारे राजकीय लाभ मिळवता येतील...

पहिला लाभ – दोन धर्मांमध्ये या परिसराविषयी प्रदीर्घ काळ सुरू असलेला वाद सोडविण्यात यश आल्याचा आणि आपल्या अनेक जाहीरनाम्यांत दिलेले आश्वासन पूर्ण केल्याचा दावा करता येईल. दुसरा लाभ – याने पंतप्रधान मोदींच्या ‘राजकीय भांडवला’त भर पडते. ‘मोदी आश्वासनांची पूर्तता करतात’ हे कथ्य पक्के करता येईल. तिसरा लाभ – हे मंदिर हिंदूंसाठी अभिमानबिंदू ठरून त्यातून हिंदू धर्मियांकडून येत्या लोकसभा निवडणुकांत अधिक एकसंधपणे मतदान केले जाईल. काँग्रेस, समाजवादी पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, तृणमूल काँग्रेस यांसारख्या विरोधी पक्षांना हिंदुत्वाच्या मुद्द्यावर अधिक लक्ष केंद्रित करणे आणि या मतपेढीला आकर्षित करण्याचे नवनवे मार्ग शोधणे भाग पडेल. कदाचित सौम्य हिंदुत्व या संकल्पनेच्या आधारे कथ्य तयार केले जाईल. कदाचित विरोधकांची मदार असलेला जातीआधारित जनगणनेचा मुद्दा या मंदिर उद्घाटनाच्या मुद्द्यापुढे निष्प्रभ ठरेल. कदाचित डीएमके किंवा नवबौद्धांतील काही पंथांसारख्या गटांकडून सनातन धर्मावर सध्या केल्या जात असलेल्या टीकेवर हिंदू धर्मीयांकडून तीव्र प्रतिक्रिया उमटतील. अशाप्रकारे रामजन्मभूमी मंदिराचे उद्घाटन एक घटना म्हणून किंवा जनमानसात पोहोचवलेला एक संदेश म्हणून भाजपच्या राजकारणासाठी लाभदायक ठरेल.

## संपादकीय »

# पै पैचा हिशेब

***पैसा या घटकाच्या स्वच्छतेची हमी देण्यासाठी किमान दोन घटकांची गरज अनिवार्य असते. ज्यास तो प्राप्त झाला त्याने त्याची वाच्यता करणे हे जसे महत्त्वाचे तसेच त्याच वेळी तो कोणामुळे वा कोणाकडून प्राप्त झाला हे कळणेही तितकेच महत्त्वाचे.***

पैसा या घटकाच्या स्वच्छतेची हमी देण्यासाठी किमान दोन घटकांची गरज अनिवार्य असते. ज्यास तो प्राप्त झाला त्याने त्याची वाच्यता करणे हे जसे महत्त्वाचे तसेच त्याच वेळी तो कोणामुळे वा कोणाकडून प्राप्त झाला हे कळणेही तितकेच महत्त्वाचे. यातील एकाच घटकाचा तपशील व्यवहाराच्या नैतिकतेची हमी देण्यास पुरेसा नसतो. म्हणूनच सर्वोच्च न्यायालय निवडणूक आयोगास कोणास किती मिळाले याचा तपशील तयार ठेवा असे बजावते आणि हा तपशील समोर येण्याची शक्यता निर्माण होते तेव्हा कोणाही सच्च्या लोकशाहीप्रेमीस आनंदाचे भरते आल्यावाचून राहणार नाही. सरन्यायाधीशांच्या घटनापीठासमोर सध्या निवडणूक रोख्यांसंदर्भातील सुनावणी सुरू आहे. या प्रकरणाचा निकाल लागेल तेव्हा लागेल.

**मराठा आरक्षणाच्या मागणीचा उग्र झालेला प्रश्न सोडवायचा कसा, असा पेच सरकारसमोर उभा ठाकला आहे. गेल्या २० वर्षांत सार्वत्रिक निवडणुकांच्या आधी काही महिने हा विषय सातत्याने उफाळून येत आला आहे. पण त्यामुळेच या प्रश्नाची धग वाढली आहे, हे नाकारता येणार नाही. म्हणूनच आता तात्कालिक पाणी शिंपडण्याऐवजी हे वादळ कायमस्वरूपी शमेल, यासाठीचे पाऊल सरकारने उचलायला हवे.**

# मराठा आरक्षण मिळणार कसे?

तसा मार्ग खुद्द मराठा आंदोलकांनीच सरकारला दाखवला आहे. तो म्हणजे मराठा समाजाला सरसकट कुणबी दाखले देण्याचा. याचाच साधा अर्थ म्हणजे, मराठा समाजाला ओबीसी आरक्षणात अंतर्भूत करणे. खरे तर, या समाजाच्या ओबीसीकरणाची मागणी आजची नाही. नव्वदच्या दशकात मंडल आयोगाच्या अंमलबजावणीपासूनच मराठा समाजातील विविध घटकांमधून ही मागणी केली जात होती. आणि प्राप्त परिस्थितीत, मराठा समाजाला कायमस्वरूपी आणि न्याय्य आरक्षण देण्याचा हाच एकमेव मार्ग आहे. ते कसे, हे पाहू. तेव्हा राज्यात देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने नवा कायदा करून मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण दिले होते. ते सर्वोच्च न्यायालयात टिकले नाहीच. उलट, याबाबत निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने काही घटनात्मक मुद्दे अधोरेखित केले. त्यातील पहिला



म्हणजे, इंद्रा साहनी खटल्यानुसार ५० टक्के आरक्षणमर्यादा ओलांडता येणार नाही हा. तर दुसरा मुद्दा होता मोदी सरकारने केलेल्या १०२व्या घटनादुरुस्तीचा. या घटनादुरुस्तीने राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाला वैधानिक दर्जा दिलाच, पण मागासवर्ग यादीत बदल करण्याचे राज्यांचे अधिकार काढून घेतले होते. त्यामुळे फडणवीस सरकारने अधिकार नसताना मराठा समाजाला आरक्षण दिले कसे, असा प्रश्न उपस्थित होतो. शिवाय हे आरक्षण ज्या न्या. गायकवाड आयोगाच्या अहवालावरून देण्यात आले होते, त्या अहवालातील त्रुटी न्यायालयाने दाखवून दिल्या आहेत. आता याबाबत दुरुस्ती (क्युरेटिव्ह) याचिका राज्य सरकारने दाखल करून घेतली आहे. सध्या याच न्यायालयीन प्रक्रियेचा हवाला राज्यकर्त्यांकडून दिला जात आहे. परंतु ५० टक्क्यांची मर्यादा न ओलांडता राज्य सरकार हे आरक्षण देणार तरी कसे? दुसरे म्हणजे, हे आरक्षण ‘एसईबीसी’ या सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासांच्या वेगळ्या प्रवर्गांतर्गत देण्यात आले होते. हा एसईबीसी प्रवर्ग केवळ राज्याच्या पातळीवर अस्तित्वात असल्यामुळे ओबीसींप्रमाणे सर्व आरक्षण लाभ यात नव्हते. असे असताना, आता तोच न्यायालयीन लढा पुन्हा लढून हाती काय येणार आहे? या हरणाऱ्या किंवा बिनफायद्याच्या लढाईत गुंतून मराठा समाजाने कालापव्यय तरी का करून घ्यायचा? हे ध्यानात आल्यामुळेच तर मराठा समाज सरसकट कुणबी दाखल्यांची मागणी करतो आहे. त्याबाबत राज्य सरकारने न्या. संदीप शिंदे समिती गठित केली.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# जरांगे पाटील यांचं उपोषण मागे!

## मराठा आरक्षणासाठी सरकारला नवी डेडलाइन

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांचं जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटीमध्ये उपोषण सुरु होतं. राज्य सरकारच्यावतीनं निवृत्त न्यायमूर्ती एम. जी. गायकवाड आणि न्यायमूर्ती सुनिल सुक्रे यांनी मनोज जरांगे यांच्याशी चर्चा केली. यावेळी प्रहारचे आमदार बच्चू कडू देखील उपस्थित आहेत.**



मनोज जरांगे यांच्याशी मराठा आरक्षण, कुणबी प्रमाणपत्र यासंदर्भात न्यायमूर्ती यांनी चर्चा केली. ही चर्चा सुरु असतानाच राज्य सरकारच्यावतीनं मंत्री उदय सामंत, मंत्री धनंजय मुंडे, मंत्री संदिपान भुमरे, मंत्री अतुल सावे यांच्यासह आमदार उपस्थित होते.

न्यायमूर्ती आणि राज्य सरकारच्या शिष्टमंडळाशी चर्चा झाल्यानंतर मनोज जरांगे यांनी राज्य सरकारला वेळ देण्यास तयार असल्याचं म्हटलं. मनोज जरांगे यांनी राज्य सरकारला मराठा आरक्षणासाठी २ जानेवारी २०२४ पर्यंत मुदत दिली आहे.

निवृत्त न्यायमूर्ती एम.जी. गायकवाड आणि सुनिल सुक्रे यांनी मराठा समाज मागास असल्याचं सिद्ध होत नाही, असं निरीक्षण कोर्टानं नोंदवल्याचं मनोज जरांगे यांनी सांगितलं. राज्य सरकारकडून अहवाल तयार करण्यात येत आहे. घाई गडबडीत घेतलेला निर्णय कोर्टात टिकत नाही, असं देखील गायकवाड आणि सुक्रे यांनी सांगितलं. मराठा समाजाला मागास ठरवण्यासाठी नवा राज्य मागासवर्ग आयोग स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती देखील जरांगे यांना देण्यात आली. यावर न्यायमूर्ती यांनी ज्यांच्याकडे कुणबीच्या नोंदी असतील त्यांच्या रक्त संबंधातील नातेवाइकांना प्रमाणपत्र देण्यात येतील, न्यायमूर्ती यांनी सांगितलं.

निवृत्त न्यायमूर्तींकडून मराठा आरक्षणासाठी नव्यानं अहवाल तयार केला जात असल्याची माहिती देखील मनोज जरांगे यांना देण्यात आली. मराठा समाजाचं सर्वेक्षण करण्यासाठी एकापेक्षा अधिक संस्थांची नियुक्ती करण्यात यावी, असं देखील जरांगे म्हणाले. रा मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला मराठा आरक्षणासाठी दोन महिन्यांचा वेळ देण्यास तयार आहे, असं म्हटलं.

आता देत असलेला वेळ शेवटचा असून या वेळी दगाफटका झाल्यास मुंबईच्या दिशेनं आगेकूच करायचं, राज्य सरकारच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय नाड्या बंद करायच्या, असं मनोज जरांगे म्हणाले. मनोज जरांगे यांच्याकडून राज्य सरकारला नवी डेडलाइन देण्यात आलेली आहे. २ जानेवारी ही डेडलाइन मनोज जरांगे यांनी दिली. ज्य सरकारतर्फे अंतरवाली सराटीमध्ये दाखल झालेल्या मंत्री धनंजय मुंडे यांनी ७ डिसेंबरला अधिवेशन सुरु झालं की ८ डिसेंबरला मराठा आरक्षणासाठी सर्वपक्षीय प्रस्ताव मांडण्याची तयारी असल्याचं आश्वासन मनोज जरांगे यांना दिलं. शिंदे समितीनं राज्यभरात काम करावं, कुणबी नोंदी आढळतील त्यांच्या रक्तातील नातेवाईकांना जात प्रमाणपत्र देण्यात यावं, असं म्हटलं. राज्य सरकारला २ जानेवारीपर्यंत वेळ देत आहे. आज उपोषण स्थगित करत असलं तरी साखळी उपोषण सुरु राहणार असल्याचं मनोज जरांगे म्हणाले.

### सरकारने दगाफटका केला तर

» राज्य सरकार आपल्याकडे वेळ मागतंय. आपण मराठ्यांनी फक्त त्यांच्यावर विश्वास ठेवायचा आहे. परंतु, जर या दोन महिन्यांत राज्य सरकारने काही दगा-फटका केला तर यांच्या नाड्या आवळायच्या. मी उपोषण मागे घेतल्यानंतर आठ दिवसांत बरा होऊन परत येईन. त्यानंतर पुन्हा एकदा राज्याचा दौरा करू. राज्यातल्या गावागावातल्या लोकांना भेटू. दोन महिन्यांनी काय होतं ते पाहू. गेली ३५-४० वर्षे आपण वाट पाहिली आहे. आता अजून दोन महिने वाट पाहू. परंतु, आता यांनी दगाफटका केला तर आपण यांच्या पूर्ण नाड्या बंद करू. यांची आर्थिक नाडी बंद करू. यांच्या सामाजिक आणि व्यावसायिक नाड्या बंद करू, म्हणजेच मुंबईची नाकेबंदी करू. मुंबईचं नाक बंद करून टाकू. राज्यातल्या सगळ्या मराठ्यांना 'चलो मुंबई’चा नारा देऊ. सरकारमधील लोकांना घराबाहेर पडता आलं नाही पाहिजे. त्यासाठी मुंबईत ठिय्या मांडू.

# सरसकट आरक्षणाची मागणी नाही!

## जरांगेंनी उपोषण सोडताच मुख्यमंत्र्यांचं वक्तव्य

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठा आरक्षणासाठी बेमुदत उपोषणाला बसलेल्या मनोज जरांगे पाटील यांनी आज (२ नोव्हेंबर) त्यांचं उपोषण मागे घेतलं. राज्य सरकारच्या शिष्टमंडळाने जालन्यातील अंतरवाली सराटी येथे जाऊन मनोज जरांगे यांची भेट घेतली. जरांगे यांना राज्य सरकारने आतापर्यंत केलेल्या कामाची माहिती दिली. तसेच आरक्षणाचा तिढा सोडवण्यासाठी राज्य सरकार पुढील दोन महिन्यांत काय काय करणार आहे याचीदेखील माहिती दिली.**



ही माहिती देत राज्य सरकारने मनोज जरांगे पाटील यांच्याकडे दोन महिन्यांचा वेळ मागितला आहे. त्यानुसार जरांगे पाटलांनी राज्य सरकाला दोन महिन्यांचा वेळ देत उपोषण मागे घेत असल्याचं जाहीर केलं. मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घेतल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली.

यावेळी शिंदे यांना मराठ्यांच्या सरसकट आरक्षणाबाबत प्रश्न विचारला. त्यावर एकनाथ शिंदे म्हणाले, ज्यांच्या कुणबी म्हणून नोंदी आहेत त्यांना युद्धपातळीवर जातप्रमाणपत्र द्या, अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. सरसकट आरक्षणाची मागणी नाही, ज्यांच्या नोंदी आहेत, त्यांना दाखले देण्याची मागणी आहे. यामध्ये सरकार वेळकाढूपणा करणार नाही. सरसकट आरक्षणाच्या मागणीबाबत प्रश्न विचारल्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, तुम्ही पत्रकार असं कुठेही भरकटवू नका. जरांगेंनी सांगितलं आहे की, ज्यांच्या कुणबी म्हणून नोंदी आहेत, त्यांना तुम्ही तात्काळ दाखले देण्याचं काम करा.

त्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात १०-१० लोक अधिकचे द्या. जातप्रमाणपत्र देण्याचं काम युद्धपातळीवर करा. पुढच्या दोन महिन्यांत हे काम पूर्ण करा. तशा प्रकारचं आश्वासन आमच्या लोकांनी जरांगे यांना दिलं आहे. दुसऱ्या बाजूला उपोषण सोडताना मनोज जरांगे पाटील कार्यकर्तांना म्हणाले, आपण या दोन महिन्यांत आपलं आंदोलन चालूच ठेवू.

# सातारा: संपूर्ण जिल्हा दुष्काळी जाहीर करा!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

साताऱ्यातील माण खटाव फलटण उत्तर कोरेगाव व सातारा जावळी तालुक्यातील शेतकऱ्यांनी दुष्काळ जाहीर न झाल्याबद्दल संताप व्यक्त केला आहे. संपूर्ण सातारा जिल्हा दुष्काळी म्हणून जाहीर करण्याची मागणी आमदारांनी केली आहे .जिल्ह्यातील आमदारांनीही आक्रमक भूमिका घेत प्रशासनाशिवाय आपलेही प्रस्ताव शासनाकडे सादर केले आहेत. प्रशासनाने स्वतंत्र अहवाल देऊनही जाहीर केलेल्या दुष्काळी तालुक्यात समावेश झाला नाही .यामुळे अन्याय झाल्याची भावना येथील शेतकऱ्यांमध्ये आहे. सातारा जिल्हा प्रशासनाने या तालुक्यांचा स्वतंत्र प्रस्ताव पाठवूनही या प्रस्तावाकडे राज्याच्या व केंद्राच्या समितीने दुर्लक्ष केल्याने समावेश होऊ शकला नाही. याबाबत आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले शशिकांत शिंदे जयकुमार गोरे दीपक चव्हाण यांनी शासनाविरोधात आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे.

हा सर्वे चुकीच्या चुकीचा आहे. दुष्काळी तालुके जाहीर करताना माण, खटाव, फलटण, उत्तर कोरेगाव, सातारा-जावळी तालुका वगळला आहे. सातारा जिल्ह्यात अनेक तालुके दुष्काळी असताना दोनच तालुके कसे दुष्काळी असू शकतात असा प्रश्न जिल्ह्यातील आमदारांनी केला आहे.संपूर्ण जिल्हा दुष्काळी म्हणून जाहीर करावा अशी मागणी आमदारांनी केली आहे.

# तुम्ही हॉटेलमध्ये कुणाबरोबर थांबल्या!

## » मोईत्रांना खासगी प्रश्न विचारल्याचा गंभीर आरोप

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा यांच्यावर भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांनी लोकसभेत प्रश्न विचारण्याच्या बदल्यात लाच घेतल्याचा आरोप केला. यानंतर लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी लोकसभेच्या आचार समितीला चौकशी करण्यास सांगितले. आज (२ नोव्हेंबर) मोईत्रा जबाब नोंदवण्यासाठी आचार समितीसमोर हजर झाल्या.**



मात्र, बैठकीत समितीच्या प्रमुखांनी महुआ मोईत्रांना आक्षेपार्ह खासगी प्रश्न विचारल्याचा आरोप या समितीतील काही सदस्य खासदारांनी केला. तसेच याचा निषेध म्हणून ते बैठकीतून बाहेर पडले. यावेळी त्यांनी संतापलेल्या अवस्थेत घडलेला प्रकार सांगितला. यावेळी महुआ मोईत्रा आणि बसपाचे खासदार दानिश अली बैठकीतून बाहेर पडले. तसेच समितीचे अध्यक्ष आक्षेपार्ह व्यक्तिगत प्रश्न विचारत असल्याचा आरोप केला. दानिश अली म्हणाले, “आम्ही बैठकीतून निघून आलो कारण समितीचे प्रमुख महुआ मोईत्रा यांना रात्री कुणाशी बोलता, काय बोलता असे प्रश्न विचारत होते.

तुम्ही हॉटेलमध्ये कुणाबरोबर थांबल्या होत्या, कुणी बिल दिलं, असेही प्रश्न विचारण्यात आले. हे मर्यादा ओलांडणारं आहे. एका महिलेचं चारित्र्यहनन करण्यासाठी आचार समिती स्थापन झालेली नाही.” “आम्हाला सांगण्यात आलं की एनआयसीचा अहवाल गुप्त आहे.

दुसरीकडे श्रीकांत दुबे एक दिवस आधीच ट्रीट करून किती वेळा या पोर्टलवर लॉग इन झालं हे सांगतात. कुणीही सरकारच्या विरोधात किंवा एखाद्या उद्योगपतीच्या विरोधात बोलू नये म्हणून हे प्रकरण रचण्यात आलं आहे,” असा आरोप दानिश अली यांनी केला. माध्यमांशी बोलताना संयुक्त जनता दलाचे खासदार गिरीधर यादव म्हणाले, “समितीच्या प्रमुखाने एका महिलेला खूप व्यक्तिगत प्रश्न विचारले. त्यांना एका महिलेला खासगी प्रश्न विचारण्याचा कोणताही अधिकार नाही. त्यामुळेच आम्ही बैठकीतून निघून आलो. तुम्ही तुमच्या मित्राशी किती वेळा बोलला असेही प्रश्न विचारण्यात आले.” काँग्रेस खासदार उत्तर कुमार रेड्डी म्हणाले, “समितीचं वर्तन नैतिकतेला धरून नव्हतं. ज्या प्रकारे महुआ मोईत्रा यांना प्रश्न विचारले गेले त्यावरून समितीचे प्रमुख इतर कुणाच्या सांगण्यावरून बोलत होते असं वाटलं.

हे फार फार वाईट आहे. मागील दोन दिवसांपासून आम्ही त्यांच्याकडे काही गोष्टींची चौकशी करत होतो. एनआयसी पोर्टलप्रकरणी आम्ही माहिती मागितली. ते त्यावर प्रतिसाद देत नव्हते.

या प्रकरणात पैशाचा व्यवहार झाल्याचा काहीही पुरावा नाही. असं असतानाही समितीचे प्रमुख महुआ मोईत्रा यांना विचारत होते की, त्या कोठे गेल्या होत्या, कुठे भेटत होत्या, तुमच्या फोनचे रेकॉर्ड्स देऊ शकता का.

### मित्राशी किती वेळा बोलला?

» महुआ मोईत्रा आणि बसपाचे खासदार दानिश अली बैठकीतून बाहेर पडले. तसेच समितीचे अध्यक्ष आक्षेपार्ह व्यक्तिगत प्रश्न विचारत असल्याचा आरोप केला. दानिश अली म्हणाले, “आम्ही बैठकीतून निघून आलो कारण समितीचे प्रमुख महुआ मोईत्रा यांना रात्री कुणाशी बोलता, काय बोलता असे प्रश्न विचारत होते. तुम्ही हॉटेलमध्ये कुणाबरोबर थांबल्या होत्या, कुणी बिल दिलं, असेही प्रश्न विचारण्यात आले. हे मर्यादा ओलांडणारं आहे. दुसरीकडे श्रीकांत दुबे एक दिवस आधीच ट्रीट करून किती वेळा या पोर्टलवर लॉग इन झालं हे सांगतात. कुणीही सरकारच्या विरोधात किंवा एखाद्या उद्योगपतीच्या विरोधात बोलू नये म्हणून हे प्रकरण रचण्यात आलं आहे,” असा आरोप दानिश अली यांनी केला.

# जनता काँग्रेसला धडा शिकवेल!

## » राजस्थानात गरजले योगी आदित्यनाथ

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राजस्थान विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी तिजारा विधानसभा क्षेत्रात सभा घेतली. बाबा बालक नाथ यांचा प्रचार योगी आदित्यनाथ करत आहेत. आपल्या भाषणात त्यांनी राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांच्यावर आणि त्यांच्या सरकारवर कडाडून टीका केली. राजस्थानची जनता काँग्रेसला धडा शिकवेल असंही त्यांनी म्हटलं आहे.**



उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आपल्या भाषणात म्हणाले की, “उदयपूरच्या कन्हय्यालाल प्रकरण हत्या प्रकरणाचा छडा लावण्यात राजस्थानचं सरकार अपयशी ठरलं. आमच्या अयोध्येत भव्य राम मंदिर उभं राहतं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी असल्यानेच हे मंदिराची निर्मिती सुरु झाली. आमच्या सरकारमध्ये भव्य राम मंदिर उभारलं जातं आहे. तसंच काश्मीरमधून कलम ३७० हटवण्यात आलं. काँग्रेस सरकारला अयोध्या प्रश्न भिजत ठेवायचा होता. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी काश्मीरमधून ३७० चं कलम हटवून तिथला दहशतवाद संपवला आहे असंही योगी आदित्यनाथ आपल्या भाषणात म्हटलं आहे. आपल्या भाषणात योगी आदित्यनाथ म्हणाले, “तालिबानचा फक्त एकच उपाय आहे.

बजरंगबलीची गदा. गाझामध्ये इस्रायल ज्याप्रमाणे तालिबानी मानसिकता चिरडण्याचं काम करतो आहे. तशाच पद्धतीने आपणही दहशतवादविरोधात लढलं पाहिजे. एकदम निवडून अराजकता, गुंडगिरी, दहशतवाद हे संपवले पाहिजेत. या सगळ्या गोष्टी समाजासाठी कलंक आहेत. त्या बजरंगबलीच्या गदेनेच संपवल्या पाहिजेत. गुंडगिरी आणि अराजकता यांच्याशी जेव्हा मतांचं राजकारण जोडलं जातं तेव्हा महिला, गरीब, व्यापारी, तसंच सगळा सभ्य समाज त्याच्या विळख्यात सापडतो.

### दहशतवादाविरोधात लढलं पाहिजे

» गाझामध्ये इस्रायल ज्याप्रमाणे तालिबानी मानसिकता चिरडण्याचं काम करतो आहे. तशाच पद्धतीने आपणही दहशतवादविरोधात लढलं पाहिजे. एकदम निवडून अराजकता, गुंडगिरी, दहशतवाद हे संपवले पाहिजेत. गुंडगिरी आणि अराजकता यांच्याशी जेव्हा मतांचं राजकारण जोडलं जातं तेव्हा महिला, गरीब, व्यापारी, तसंच सगळा सभ्य समाज त्याच्या विळख्यात सापडतो.” असंही योगी आदित्यनाथ म्हणाले.

# केजरीवालांचं ईडी नोटीशीला प्रत्युत्तर!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज



दिल्लीतील कथित अबकारी धोरण घोटाळ्यात झालेल्या आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी सक्तवसुली संचलनालयानं ( ईडी ) मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना आज, गुरूवारी ( २ नोव्हेंबर ) चौकशीसाठी हजर राहण्यासाठी समन्स बजावलं होतं. आता अरविंद केजरीवाल यांनी ईडीला प्रत्युत्तर दिलं आहे. भाजपाच्या सांगण्यावरून नोटीस पाठवण्यात आली होती, असा आरोप केजरीवालांनी केला आहे. अरविंद केजरीवाल म्हणाले, “ईडीनं पाठवलेली नोटीस बेकायदेशीर आणि राजकीय हेतूनं प्रेरित आहे. भाजपाच्या सांगण्यावरून ही नोटीस पाठवली. चार राज्यांच्या निवडणुकीत प्रचार करू नये म्हणून नोटीस पाठवण्यात आली होती. ईडीनं तातडीनं ही नोटीस मागे घ्यावी.” दरम्यान, अरविंद केजरीवाल ईडी चौकशीसाठी हजर राहणार नाहीत. मध्य प्रदेशात प्रचारासाठी केजरीवाल जाणार आहेत. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान आणि अरविंद केजरीवाल सिंगरौली येथे प्रचार रॅली करणार आहेत. ईडीच्या अधिकाऱ्यांनी दिल्लीचे समाजकल्याण मंत्री राजकुमार आनंद यांच्या घरी छापा टाकला असून घराची झडती सुरू आहे. त्याचप्रमाणे राजकुमार आनंद यांच्याशी संबंधित ९ ठिकाणांवरही ईडीच्या अधिकाऱ्यांनी छापेमारी केली आहे.

# सायरा बानो शाहरुखला शुभेच्छा देताना भावूक



किंग खान शाहरुखचा आज ५८ वा वाढदिवस साजरा होत आहे. त्यानिमित्तानं त्याला लाखो चाहत्यांनी शुभेच्छा दिल्या आहे. जगाच्या पाठीवर सर्वाधिक फॅन्स असणारा अभिनेता सेलिब्रेटी म्हणून शाहरुखचे नाव घ्यावे लागेल. अशात त्यानं गेल्या तीन दशकांहून अधिक काळ आपल्या अभिनयानं स्वताची वेगळी ओळख निर्माण केली आहे. बॉलीवूडमधील अनेक सेलिब्रेटींनी शाहरुखचं कौतुक केलं आहे. त्याचं अभिष्टचिंतन करुन त्याला भावी आयुष्यासाठी शुभेच्छाही दिल्या आहेत. या सगळ्यात ज्येष्ठ अभिनेत्री सायरा बानो यांनी दिलेल्या प्रतिक्रियेमुळे नेटकऱ्यांचे लक्ष वेधले गेले आहे. बॉलीवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री सायरा बानो यांनी गेल्या चार दशकांहून अधिक काळ आपल्या अभिनय आणि सौंदर्याने चाहत्यांच्या मनावर अधिराज्य केले. सोशल मीडियावर शाहरुखच्या चाहत्यांनी त्याच्याप्रती व्यक्त केलेल्या भावना खूप काही सांगून जाणाऱ्या आहेत. मराठी सेलिब्रेटींनी देखील शाहरुखप्रती आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. सोशल मीडियावर त्या पोस्ट व्हायरल झाल्या आहेत. सायराजींनी इंस्टावर एक पोस्ट शेयर केली आहे. त्यात त्यांनी शाहरुखसोबत फोटो शेयर केला आहे. सायराजींनी त्यावर लिहिलं आहे की, प्रिय शाहरुख मी यापूर्वी देखील अनेकदा बोलली आहे आणि पुन्हा एकदा सांगते, मला तर मुलगा असता तर तो अगदी तुझ्यासारखाच दिसला असता. दिलीप कुमार आणि माझ्याप्रती तुझी भावना ही तू अनेकदा बोलून दाखवली आहेस. मला शाहरुखचं एका गोष्टीसाठी कौतुक आहे ते म्हणजे त्यानं नेहमीच त्याच्या कृतीतून आदर दाखवला आहे. माझ्या कठीण काळात त्यानं माझ्याशी संवाद साधला आहे. यासाठी मी नेहमीच त्याची आभारी असेन. अशा शब्दांत सायराजींनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

# रिंकू लग्न करणार नाही ?



गेल्या अनेक दिवसांपासुन बॉलिवुडमध्ये विविध विषयांवरचे नवनवीन सिनेमे भेटीला येत आहेत. जवान, द व्हॅक्सीन वॉर, गदर २, ओह माय गॉड २ असे अनेक सिनेमे प्रेक्षकांना आवडले. अशातच बॉलिवुडमध्ये आणखी एक सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. हा सिनेमा म्हणजे द लेडी किलर. नुकताच या सिनेमाचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आलाय. द लेडी किलर सिनेमाच्या ट्रेलरची सुरुवात होते जेव्हा अर्जुन एका महाराजाला भेटण्यासाठी एका हिल स्टेशनमधील शाही बंगल्यावर पोहोचतो. तो त्या बंगल्यात भूमीला भेटतो. दोघांमध्ये रोमान्स होतो. पुढे अर्जुन आणि भुमीची प्रेमकथा जसजशी पुढे सरकत जाते तसतशी अनेक रहस्य उलगडताना दिसतात. ट्रेलरच्या शेवटी अर्जुन म्हणतो, "पोलीस दरवाजा तोडून घरात घुसतील आणि आपल्याला नग्न अवस्थेत पकडले जाईल" यावर भूमी त्याला उत्तर देते, "मी तुला सांगितले होते माझ्या प्रतिष्ठेची थट्टा मांडू नको" असं म्हणत भुमीने अर्जुनकडे पिस्तूल रोखलेले दिसते. द लेडी किलरच्या ट्रेलरमध्ये अर्जुन आणि भूमी यांच्यात अनेक किसींग सीन्स पाहायला मिळतात. ट्रेलरमध्ये या दोघांची भन्नाट रोमँटीक केमिस्ट्री पाहायला मिळते. द लेडी किलरचं दिग्दर्शन अजय बेहेल यांनी केलंय.

# सनीला शाहरुख - सलमानमधील कोणती गोष्ट खटकते




प्रसिद्ध अभिनेता सनी देओल हा नेहमीच त्याच्या आक्रमक आणि परखड स्वभावासाठी ओळखला जाणारा सेलिब्रेटी आहे. गेल्या काही दिवसांपासून सनी देओल हा वेगवेगळ्या कारणांसाठी चर्चेत आला आहे. तब्बल २१ वर्षांनंतर त्याचा गदर २ नावाचा चित्रपट प्रदर्शित झाला. त्याला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. सनीनं गदरची सक्सेस पार्टी आयोजित केली होती. त्यात बॉलीवूडमधील अनेक सेलिब्रेटी सहभागी झाले होते. शाहरुख सलमानपासून विकी कौशल, रणवीर सिंग पर्यत सगळ्यांनी या कार्यक्रमामध्ये हजेरी लावली होती. यावेळी सनीनं सर्वांचे आभार मानले होते. आमीर खानही जातीनं या कार्यक्रमाला उपस्थिती लावली होती. यामुळे सनी देओल आणि बाकीच्या कोणत्याही अभिनेत्यांमध्ये कोणतीही वैमनस्य नाही हे स्पष्ट झाले. आता सनीनं कॉफी विथ करणमध्ये हजेरी लावली होती. यावेळी करणनं त्याला बॉलीवूडमधील तीन दिग्गज अभिनेत्यांविषयी प्रश्न विचारले होते. त्यात सलमान, आमिर आणि शाहरुखविषयी प्रश्न विचारुन सनीला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला होता. त्यावर त्यानंही दिलेलं उत्तर चाहत्यांच्या प्रतिक्रियेचा विषय आहे. सनीनं करणच्या त्या प्रश्नाला उत्तर देताना म्हटलं की, मला शाहरुख आणि सलमानमधील काही गोष्टी आवडत नाहीत. त्यात शाहरुखविषयी बोलायचे झाल्यास तो त्याची जी कंपूशाही तयार करतो मला त्याबद्दल राग आहे. दुसरीकडे सलमानविषयी बोलायचे झाल्यास तो सगळ्यांनाच बॉडी बिल्डर करण्याच्या मागे लागला आहे. त्यामुळे मी त्यांना आणखी काय सांगणार आणि त्यांच्याविषयी काय बोलणार हा प्रश्न आहे. सनीनं करण जोहरच्या कॉफी विथ करणच्या आठव्या सीझनमध्ये सहभाग घेतला होता. त्यावेळी त्यानं बॉलीवूडमधील वेगवेगळ्या गोष्टींवर मतं व्यक्त केली आहे. त्याची चर्चा होत आहे. सनीनं यापूर्वी देखील बॉलीवूडचा खिलाडी अक्षय कुमार आणि त्याच्या ओएमजी चित्रपटाविषयी दिलेली प्रतिक्रिया चर्चेत आली आहे. यापूर्वी सनीनं २००५ मध्ये करण जोहरच्या कॉफी विथ करणमध्ये भाग घेतला होता. त्यानंतर आता तो पुन्हा एकदा त्या शोमध्ये सहभागी झाला.

# 'एकदा येऊन तर बघा' २४ नोव्हेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला!



कुणी काही का म्हणेना पण गेल्या काही दिवसांपासून फुलंब्रीकर कुटूंबाची गोष्ट फारच चर्चेत आली आहे. सोशल मीडियावर त्याविषयी नेटकऱ्यांनी दिलेल्या प्रतिक्रियाही भन्नाट आहे. हे कुटूंब एवढं का चर्चेत आलं आहे, त्यामागील कारण काय याची चाहत्यांना मोठी उत्सुकता आहे. आपली घरची माणसं आपला आधारस्तंभ असतात. आनंदाच्या, दुःखाच्या, यश-अपयशाच्या कोणत्याही प्रसंगात कुटुंबाची साथ-सोबत असेल तर अशक्य वाटणाऱ्या अनेक गोष्टी साध्य करता येतात. एकमेकांशी असलेले रुसवे-फुगवे आणि छोट्या-छोट्या गोष्टींमधून हसत खेळत गमतीदार आयुष्य जगणारं असंच एक भन्नाट फुलंब्रीकर कुटुंब २४ नोव्हेंबरला आपल्या भेटीला येतंय. या कुटुंबाची आणि त्यांच्या नात्यातील गंमत अनुभवायची असेल तर प्रसाद खांडेकर दिग्दर्शित 'एकदा येऊन तर बघा' हा चित्रपट तुम्हाला पाहावा लागेल. श्रावण, फाल्गुन आणि कार्तिक या तीन भावांची ही गोष्ट आहे. फुलंब्रीकर कुटुंब हॉटेल व्यवसाय सुरु तर करतात पण ग्राहक यावेत यासाठी त्यांना काय आणि किती प्रयत्न करावे लागतात? ज्या गिऱ्हाईकांची वाट बघत आहेत ते गिऱ्हाईक हॉटेल मध्ये आल्यावर हे कसे एका प्रॉब्लेम मध्ये अडकत जातात आणि मग पुढे काय होतं ? त्यातून त्यांच्यावर कोणकोणते प्रसंग ओढवतात आणि त्याला ही मंडळी कशी सामोरी जातात? याची गमतीशीर गोष्ट म्हणजे 'एकदा येऊन तर बघा' हा चित्रपट. गिरीश कुलकर्णी,तेजस्विनी पंडित, प्रसाद खांडेकर, नम्रता संभेराव, ओंकार भोजने फुलंब्रीकर कुटुंबात पहायला मिळणार आहेत. या पाच जणांसोबत सयाजी शिंदे, भाऊ कदम, विशाखा सुभेदार, पॅडी कांबळे, राजेंद्र शिसातकर वनिता खरात, शशिकांत केरकर, रोहित माने, सुशील इनामदार आदि कलाकारांची भली मोठी फौज चित्रपटात आहे. हे कुटुंब तुम्हाला निखळ हास्याची मेजवानी देईल, असा विश्वास दिग्दर्शक प्रसाद खांडेकर व्यक्त करतात. २४ नोव्हेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला येणाऱ्या प्रसाद खांडेकर दिग्दर्शित 'एकदा येऊन तर बघा' या चित्रपटाची निर्मिती परितोष पेंटर, राजेशकुमार मोहंती,दिपक क्रिशन चौधरी, सेजल दिपक पेंटर यांचीअसून सहनिर्मिती अश्विन पद्मनाभन, सत्यनारायण मूरथी, डॉ.झारा खादर यांची आहे.

# शमी-सिराजचा कहर!

## » भारताचा श्रीलंकेवर 302 धावांनी विराट विजय

नवी दिल्ली । ।वृत्तसंस्था

**मोहम्मद शमी (18 धावांत 5 विकेट), मोहम्मद सिराज (16 धावांत 3 विकेट) आणि जसप्रीत बुमराह (8 धावांत 1 विकेट) यांच्या भेदक मा-याच्या जोरावर भारताने श्रीलंकेचा अवघ्या 19.4 षटकांत 55 धावांवर ऑलआऊट करून वर्ल्डकपमध्ये ऐतिहासिक विजयाची नोंद केली. गुरुवारी (2 नोव्हेंबर) मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या विश्वचषकातील या महत्त्वाच्या सामन्यात श्रीलंकेच्या पाच फलंदाजांना खातेही उघडता आले नाही आणि त्यांना या सामन्यात लाजिरवाण्या पराभवाला सामोरे जावे लागले.**

विश्वचषकातील भारताचा 7 सामन्यांतील हा सलग 7 वा विजय आहे. रोहित सेनेने दिमाखात सेमीफायनल गाठली आहे. दुसरीकडे, श्रीलंकेचा 7 सामन्यातील हा 5वा पराभव आहे.



भारताने दिलेल्या 358 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेची सुरुवात अत्यंत खराब झाली. जसप्रीत बुमराहने डावाच्या पहिल्याच चेंडूवर पथुम निसांकाची (0) शिकार केली. यानंतर दुसऱ्याच षटकात मोहम्मद सिराजने पहिल्याच चेंडूवर दिमुथ करुणारत्नेला (0) बाद केले. अशाप्रकारे श्रीलंकेने पहिल्या 2 धावांवर 2 विकेट गमावल्या. त्याच षटकात सिराजने श्रीलंकेला दुसरा मोठा धक्का दिला. त्याने सदिरा समरविक्रमाला (0) स्लिपमध्ये श्रेयस अय्यरकडे झेलबाद केले. श्रीलंकेने आपली ही तिसरी विकेट 2 धावांवर गमावली. चौथ्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर सिराजने तिसरी विकेट घेत श्रीलंकेचे कंबरडे मोडले. त्याने कर्णधार कुसल मेंडिसला (1) क्लीन बोल्ड केले. श्रीलंकेला अवघ्या 3 धावांवर हा चौथा मोठा धक्का बसला. जसजसा सामना पुढे सरकत गेला तसतशी श्रीलंकन संघाची स्थिती बिकट होत गेली. चरिथ असलंका 24 चेंडूत 1 धावा काढून बाद झाला. त्याला मोहम्मद शमीने बाद केले. यानंतर पुढच्याच चेंडूवर शमीने दुशान हेमंताला शुन्यावर बाद केले. ज्यानंतर श्रीलंकेची अवस्था 6 बाद 14 अशी झाली. भारतीय गोलंदाजांचा कहर सुरूच होता. चमीराला एकही धाव काढता आली नाही. अशाप्रकारे श्रीलंकेचे 7 फलंदाज अवघ्या 22 धावांवर बाद झाले. श्रीलंकेचे 5 फलंदाज शून्यावर बाद झाले. अनुभवी अँजेलो मॅथ्यूजने झुंज देण्याचा प्रयत्न केला, पण त्यालाही श्रीलंकेचा मोठा पराभव टाळता आला नाही. बुमराह, सिराज आणि शमीसमोर श्रीलंकेचे फलंदाज हतबल दिसत होते. भारताकडून शमी सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. त्याने 5 फलंदाजांना बाद केले. तर सिराजने 3 बळी घेतले. याशिवाय जसप्रीत बुमराह आणि रवींद्र जडेजा यांना प्रत्येकी 1 विकेट मिळाली. तत्पूर्वी, श्रीलंकेचा कर्णधार कुसल मेंडिसने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या टीम इंडियाची सुरुवात चांगली झाली नाही. पण सलामीवीर शुभमन गिल (92 चेंडूत 92 धावा), विराट कोहली (94 चेंडूत 88 धावा), श्रेयस अय्यर (56 चेंडूत 82 धावा) यांच्या अर्धशतकांच्या जोरावर भारताने 50 षटकात 8 विकेट गमावत 357 धावा केल्या.

### भारताचा सलग सातवा विजय

» श्रीलंकेचा पराभव करत भारताने विश्वचषकाच्या सेमीफायनलमध्ये प्रवेश केला. भारताचा हा सलग सातवा विजय होय. यंदाच्या विश्वचषकात सेमीफायनलमध्ये पोहचणारा भारत पहिला संघ आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वातील टीम इंडियाने आपला फॉर्म कायम राखत विजय नोंदवला. भारतीय संघाने गुणतालिकेत पुन्हा एकदा अव्वल स्थान काबिज केलेय. भारताने सलग सात सामन्यात विजय मिळवलाय. गोलंदाजी, फलंदाजी आणि फिल्डिंगमध्ये टीम इंडियाच्या खेळाडूंना सर्वस्वी योगदान दिले. सांघिक खेळाच्या बळावर टीम इंडियाने उपांत्य फेरीत प्रवेश मिळवला आहे.

# विराट कोहलीने सचिनला टाकले

## » एका कॅलेंडर वर्षात 8व्यांदा 1000 धावा पूर्ण

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय संघाचा स्टार फलंदाज विराट कोहलीची बॅट पुन्हा एकदा तळपली. सध्या सुरू असलेल्या विश्वचषकात श्रीलंकेविरुद्ध शानदार 88 धावांची खेळी केली. पण अवघ्या 12 धावांनी शतक हुकल्याने सर्व मुंबईच्या वानखेडे मैदानावर उपस्थित चाहते सुन्न झाल्याचे पहायला मिळाले.**

मात्र, या खेळीदरम्यान विराटने एका कॅलेंडर वर्षात सर्वाधिक 8 व्यांदा एक हजाराहून अधिक वनडे धावांचा टप्पा पार केला. याचबरोबर त्याने भारताचा माजी महान फलंदाज सचिन तेंडुलकरचा विक्रम मोडीत काढला. सचिनने सातवेळा वनडेमध्ये एका कॅलेंडर वर्षात एक हजाराहून अधिक धावा केल्या आहेत. मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर श्रीलंकेविरुद्ध 34 धावा केल्यानंतर विराटने या वर्षी वनडेमध्ये 1000 धावा पूर्ण केल्या. अशी कामगिरी करणारा तो एकूण चौथा आणि तिसरा भारतीय फलंदाज ठरला आहे. विराटने 23 एकदिवसीय सामन्यांच्या 20 डावांमध्ये 1000 धावांचा टप्पा पार केला. सचिन तेंडुलकरने वनडे क्रिकेटमध्ये 7 कॅलेंडर वर्षात 1000 पेक्षा जास्त धावा केल्या होत्या. आता विराट कोहलीने 8 कॅलेंडर वर्षात वनडेमध्ये 1000 पेक्षा जास्त धावा करण्याचा विक्रम केला आहे.

विराट कोहलीने श्रीलंकेविरूद्धच्या सामन्यात वनडे क्रिकेटमधील आपले 70 वे अर्धशतक ठकले. याचबरोबर विराट कोहलीने श्रीलंकेचा दिग्गज माजी फलंदाज कुमार संगकाराचे एक रेकॉर्ड देखील मोडले. विराट कोहलीने वर्ल्डकप इतिहासात सर्वाधिक अर्धशतक ठोकण्याचा (सलामीवीर नसलेला फलंदाज) विक्रम मागे टाकला.



### संगकाराचा एक रेकॉर्ड देखील मोडला

» सचिन तेंडुलकरने वनडे क्रिकेटमध्ये 7 कॅलेंडर वर्षात 1000 पेक्षा जास्त धावा केल्या होत्या. आता विराट कोहलीने 8 कॅलेंडर वर्षात वनडेमध्ये 1000 पेक्षा जास्त धावा करण्याचा विक्रम केला आहे. विराट कोहलीने श्रीलंकेविरूद्धच्या सामन्यात वनडे क्रिकेटमधील आपले 70 वे अर्धशतक ठकले. याचबरोबर विराट कोहलीने श्रीलंकेचा दिग्गज माजी फलंदाज कुमार संगकाराचे एक रेकॉर्ड देखील मोडले.

# अय्यरने रोहित-कपिल यांची केली बरोबरी

नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

श्रीलंकेविरुद्ध टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्मा 4 धावा करून बाद झाल्यानंतर शुभमन गिल (92), विराट कोहली (88 धावा) आणि श्रेयस अय्यर (82) यांनी केलेल्या शानदार खेळींच्या जोरावर भारतीय संघाने 50 षटकात 8 विकेट गमावून 357 धावांची मोठी धावसंख्या उभारली.

या सामन्यात अय्यरने आपल्या डावात 6 षटकार ठोकले आणि त्याने रोहित शर्मा, कपिल देव यांच्या विक्रमाची बरोबरी केली. तसेच भारतीय संघाने या सामन्यात 357 धावा करून पाकिस्तानचा 4 वर्ष जुना विक्रमही मोडीत काढला. श्रेयस अय्यरने श्रीलंकेविरुद्ध 82 धावा केल्या आणि यादरम्यान त्याने 6 षटकार आणि 3 चौकार मारले. . खरं तर, अय्यर आता रोहित आणि कपिल यांच्यानंतर भारतासाठी विश्वचषकाच्या एका डावात 6 षटकार मारणारा तिसरा फलंदाज ठरला आहे. कपिल देवने 1983 मध्ये झिम्बाब्वेविरुद्धच्या खेळीत 6 षटकार मारले होते. तर याच वर्षी रोहित शर्माने पाकिस्तानविरुद्धच्या खेळीत 6 षटकार मारले होते. ज्यांनी अनुक्रमे 1999 आणि 2007 मध्ये हा पराक्रम केला होता. श्रेयस आता कपिल आणि रोहितसह संयुक्तपणे दुसऱ्या क्रमांकावर आला आहे. भारताने श्रीलंकेविरुद्ध 50 षटकात 8 विकेट गमावत 357 धावा केल्या आणि आता हा संघ विश्वचषकात एकाही फलंदाजाच्या शतकाविना सर्वाधिक धावा करणारा संघ बनला आहे. या सामन्यात भारताकडून एकाही फलंदाजाने शतक झळकावले नाही. याआधी विश्वचषकात शतक न करता सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम पाकिस्तानच्या नावावर होता,